**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक २९ डिसेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **देशाचं संविधान आपला दीपस्तंभ असल्याचं पंतप्रधानांच 'मन की बात' मधे प्रतिपादन.**
2. **वर्षअखेरच्या गर्दीचं व्यवस्थापन करण्यासाठी मध्यरेल्वेच्या १४ स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकिटावर निर्बंध / ३१ डिसेंबर रोजी शेगावचे गजानन महाराजांचे मंदिर भक्तासाठी रात्रभर दर्शनासाठी खुले राहणार.**
3. **अकोल्यात सुरू असलेल्या राज्यस्तरीय ॲग्रोटेक २०२४ कृषी प्रदर्शनात महाबीज बियाण्यांच्या विविध वाणांची शेतकऱ्यांनी घेतली माहिती; प्रदर्शनाचा आजचा शेवटचा दिवस आहे.**
4. **जागतिक रॅपिड आणि ब्लिट्झ बुद्धिबळ स्पर्धेत महिला गटाचं अजिंक्यपद कोनेरु हंपीने पटकावलं.**

**मन की बात**

देशाचं संविधान आपला दीपस्तंभ आणि मार्गदर्शक असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. पंतप्रधानांनी आज आकाशवाणीवरून मन की बात या कार्यक्रमात देशवासियांशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा ११७ वा भाग होता. येत्या २६ जानेवारीला देशात राज्यघटना लागू होऊन ७५ वर्षे पूर्ण होतील, त्यानिमित्तानं देशभरात अनेक उपक्रम सुरू आहेत असं त्यांनी सांगितलं. यानिमित्तानं सुरू केलेल्या 'कॉन्स्टीट्यूशन सेव्हनटी फाईव्ह डॉट कॉम' या संकेतस्थळाला युवा वर्गानं भेट द्यावी, नागरिकांनी राज्यघटनेची प्रास्ताविका वाचून त्याची ध्वनीचित्रफीत या संकेतस्थळावर अपलोड करावी असं आवाहन त्यांनी केलं.

***2025 में 26 जनवरी को हमारे संविधान को लागू हुए 75 वर्ष होने जा रहे हैं। हम सभी के लिए बहुत गौरव की बात है। हमारे संविधान निर्माताओं ने हमें जो संविधान सौंपा है वो समय की हर कसौटी पर खरा उतरा है। संविधान हमारे लिए गाइडिंग लाइट है, हमारा मार्गदर्शक है। ये भारत का संविधान ही है जिसकी वजह से मैं आज यहाँ हूँ, आपसे बात कर पा रहा हूँ।***

येत्या १३ जानेवारीपासून उत्तर प्रदेशात प्रयागराज इथं सुरू होणाऱ्या महाकुंभ मेळ्यासाठी जोरदार तयारी सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं. यंदाच्या मेळाव्याला भेट देणारे जगभरातले पर्यटक आणि भाविक हे डिजिटल महाकुंभाचे साक्षीदार होतील असं ते म्हणाले. या मेळ्याला भेट देणाऱ्या प्रत्येकानं एकतेचा संकल्प घेऊनच परत यावं, समाजातली फूट आणि द्वेषाची भावना नष्ट करण्याची शपथ घ्यावी असं आवाहन

त्यांनी केलं. यावेळी प्रधामंत्र्यांनी देशाच्या मनोरंजन क्षेत्राच्या योगदानाविषयी श्रोत्यांना सांगितलं. आपले ॲनिमेशनपट, चित्रपट आणि दूरचित्रवाणी मालिका जगभरात लोकप्रिय आहेत, त्यातून भारताच्या सर्जनशील उद्योगाची क्षमता दिसून येते असं ते म्हणाले. चित्रपट आणि मनोरंजन उद्योग क्षेत्रानं आशयघन निर्मितींच्या माध्यमातून एक भारत - श्रेष्ठ भारत ही भावना मजबूत केली असल्याचं सांगत, या क्षेत्राबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. २०२४ या वर्षात आपण चित्रपटसृष्टीतल्या अनेक महान व्यक्तींची १०० वी जयंती साजरी करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. राज कपूर मोहम्मद रफी, अक्किनेनी नागेश्वर राव गारू, तपन सिन्हा यांच्या कामगिराचा गौरव त्यांनी केला. पुढच्या वर्षी देशात पहिल्यांदाच वेव्हज् अर्थात जागतिक ध्वनी चित्र करमणूक शिखर परिषदेचं आयोजन होणार असल्याची माहिती प्रधानमंत्र्यांनी दिली. ही शिखर परिषद भारताची सर्जनशील प्रतिभा जगासमोर मांडण्याची मोठी संधी असल्याचं ते म्हणाले.

***वेव्स समिट में दुनिया भर के मीडिया और एंटरटेनमेंट इंडस्ट्री के दिग्गज क्रिएटिव वर्ल्ड के लोग भारत आएँगे। यह समिट भारत को ग्लोबल कॅन्टेंट क्रिएशन का हब बनाने की दिशा में एक महत्वपूर्ण कदम है। जब हम फाइव ट्रिलियन डॉलर इकॉनमी की ओर बढ़ रहे हैं, तब हमारी क्रिएटर इकॉनमी एक नई एनर्जी ला रही है।***

बस्तर इथं सुरू झालेल्या ‘बस्तर ऑलिम्पिक’ या अभिनव स्पर्धेची माहिती देताना ते म्हणाले की या स्पर्धा म्हणजे विकास आणि खेळाचा संगम असून, युवा प्रतिभेचा आविष्कार आहे. आरोग्य क्षेत्रात भारतानं मिळवलेल्या यशाचा उल्लेख करताना त्यांनी मलेरिया विरोधातल्या लढ्याची देशाची कामगिरी श्रोत्यांसमोर मांडली. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार देशात २०१५ ते २०२३ या काळात मलेरियाचे रुग्ण आणि त्यामुळे होणाऱ्या मृत्यूंमध्ये ८० टक्के इतकी घट झाली असल्याची माहिती त्यांनी दिली. देशवासियांनी एकत्रितपणे निर्धारानं या आव्हानाचा सामना केल्यानंच हे यश मिळाल्याचं ते म्हणाले. कर्करोगाविरोधातल्या लढाईत आयुष्मान भारत योजना मोठी भूमिका पार पाडत असून, त्यामुळे ९० टक्के रुग्णांना वेळेत उपचार मिळू लागले असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**मन की बात प्रसारण**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आजच्या मन की बात कार्यक्रमाचं थेट प्रसारण आज ठिकठिकाणी करण्यात आलं. भाजपाचे कार्यकर्ते, पदाधिकारी यांनी एकत्र येऊन हा कार्यक्रम पाहिला. या कार्यक्रमाचे प्रसारण पाहण्याची सोय भारतीय जनता पक्षाच्या वाशीम जिल्हा कार्यालयात करण्यात आली होती.

**प्लॅटफॉर्म तिकिट/शेगाव दर्शन**

वर्षअखेरच्या कालावधीत प्रचंड गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन मध्य रेल्वेने निवडक प्रमुख स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकिटांच्या विक्रीवर तात्पुरते निर्बंध घातले आहेत. प्लॅटफॉर्मवर होणाऱ्या गर्दीचे व्यवस्थापन आणि स्थानक परिसरात प्रवाशांच्या गर्दीचे नियोजन करणे हे या निर्बंधाचे उद्दिष्ट आहे. प्लॅटफॉर्म तिकिट विक्रीचे निर्बंध आजपासून २ जानेवारी च्या मध्यरात्री १२ वाजेपर्यंत लागू असतील. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, दादर, लोकमान्य टिळक टर्मिनस, ठाणे, कल्याण, पनवेल, पुणे, नागपूर, नाशिक रोड, भुसावळ, अकोला, सोलापूर, कलबुरगि आणि लातूर या स्थानकांवर हे निर्बंध लागू असून त्यातून ज्येष्ठ नागरिक, आजारी व्यक्ती, आणि ज्यांना एकट्याने प्रवास करता येत नाही अशांना सूट दिली आहे. दरम्यान, नवीन वर्षाच्या प्रसंगी बुलडाणा जिल्ह्यातील संत नगरी शेगाव येथे भक्तांची गर्दी लक्षात घेता संत श्री गजानन महाराज संस्थान मधील श्री चे समाधी स्थळ, आणि मंदिरातील सर्व विभाग भक्तांच्या दर्शनासाठी ३१ डिसेंबरच्या रात्री खुले राहणार आहेत अशी माहिती संस्थानच्या वतीने देण्यात आली आहे.

**कृषी प्रदर्शन**

डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या जयंती निमित्त अकोल्यात डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात राज्यस्तरीय 'ॲग्रोटेक २०२४' कृषी प्रदर्शन सुरु आहे. या प्रदर्शनात महाबीज म्हणजे महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाची दोन दालनं आहेत. सोयाबीनच्या संशोधित जातींचं वाण, उत्कर्ष हे मूग पिकाचं वाण आणि एमयू चव्वेचाळीस हे उडीद पिकाचं वाण अशी अनेक बियाणं यात मांडली आहेत. शेतकऱ्यांनी महाबीजच्या दालनाला भेट देऊन माहिती घेतली. महाबीजचे हे बियाणे शेतकऱ्यांनी आपली जमीन, हवामान, मशागत आणि स्थानिक परिस्थिती पाहून त्यात बदल करून वापरले तर शेतकऱ्यांना हमखास उत्पादन मिळू शकते. असा शेतकऱ्यांचा अनुभव असल्याचे आमच्या प्रतिनिधीने सांगितले आहे. सदर प्रदर्शनाचा आजचा शेवटचा दिवस आहे.

**गोलबॉल स्पर्धा**

गोंदिया येथे दृष्टीहीन मुलांच्या चौथ्या राष्ट्रीय गोलबॉल स्पर्धेत महाराष्ट्र संघाने बाजी मारत विजय मिळविला आहे. यात मुलांच्या महाराष्ट्र टीमने गुजरात च्या टीमला हरविले तर मुलींच्या महाराष्ट्र टीमने हरियाणा टीमला हरवत विजय मिळविला आहे. यासंदर्भात अधिक माहिती देत आहेत आमचे प्रतिनिधी हरिष मोटघरे--

***२०१६ मध्ये पहिल्यांदा दृष्टीहीन मुलांच्या राष्ट्रीय गोलबॉल स्पर्धेला सुरवात झाली असून ही स्पर्धा सिमला या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती तर दुसऱ्यांदा***

*हरियाणा आणि तिसऱ्यांदा उत्तर प्रदेश तर चौथ्यांदा राष्ट्रीय गोल बॉल स्पर्धेचे आयोजन पहिल्यांदा महाराष्ट्र राज्यात तेही गोंदिया जिल्यात आयोजित करण्यात आले असून ही स्पर्धा दृष्टीहीन मुले मुली फक्त आवजाच्या आधारवर खेळतात. एका बॉलच्या आत आवाज करणारे घुगरू असतात आणि लाकडी फ्लोवर वर हा गोलबॉल गेम खेळला जात असून गोंदियाच्या जिल्हा क्रीडा संकुलात हि स्पर्धा या वर्षी घेण्यात आली तर दृष्टीहीन मुलांच्या खेळाला देखील जागतिक पातळीवर नाव मिळावे म्हणून या खेळाची सुरवात २०१६ मध्ये करण्यात आली  आहे.*

विजयी चमूंना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी आणि रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले  तर दृष्टीहीन मुलांनी देखील विजय जल्लोष केला तर हा अंतिम सामना पाहण्यासाठी खेळाडूंनी मोठी गर्दी केली होती.

**बुद्‌धिबळपटू कोनेरू हंपी**

भारताची आघाडीची बुद्‌धिबळपटू कोनेरू हंपी हिनं न्यूयॉर्क इथं झालेल्या जागतिक रॅपिड आणि ब्लिट्झ अजिंक्यपद स्पर्धेत महिला गटाचं जेतेपद पटकावलं आहे. इंडोनेशियाच्या प्रतिस्पर्ध्याचा पराभव करून हंपीनं या स्पर्धेतलं आपलं दुसरं जेतेपद पटकावलं. ११ फेऱ्यांमध्ये तिनं साडेआठ गुणांची कमाई केली.

**हवामान**

नागपूरच्या हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार संपूर्ण विदर्भात हवामान कोरडे राहणार असून आज सर्वात कमी तापमानाची नोंद गडचिरोली येथे 17 पूर्णांक 4 अंश सेल्सिअस करण्यात आली आहे. नागपूरचे आजचे किमान तापमान १९ अंश सेल्सिअस तर कमाल तापमान 31 पूर्णांक 5 अंश सेल्सिअस होते.

**बॉर्डर गावस्कर कसोटी क्रिकेट सामना**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातल्या बॉर्डर गावस्कर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या मेलबर्न इथं सुरू असलेल्या चौथ्या कसोटी क्रिकेट सामन्यात, चौथ्या दिवसअखेर ऑस्ट्रेलियानं आपल्या दुसऱ्या डावात, ९ बाद २२८ धावा केल्या आहेत.

*****